| MHTH160008642022 | खटला दाखल तारीख | : | २४/११/२०२२ |
|---|---|---|---|
| | पंजीकृत तारीख | : | २४/११/२०२२ |
| | निकालाची तारीख | : | ०५/०३/२०२५ |
| | कालावधी | : | २ वर्षे, ३ महिने, १० दिवस |

**दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पालघर, जि. पालघर यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी : सतिश यादवराव कदम)

**विवाह अर्ज क्र.२११/२०२२**
**निशाणी क्र.२२**

**भगवान वामन खरात**
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : मजुरी,
रा. विराज श्रीराम हायस्कुल, कुरगाव,
पो.तारापुर, ता. जि. पालघर. ...अर्जदार.

विरुध्द

**श्रीमती सीमा भगवान खरात**
लग्नापुर्वीची कविता कडुबा इटाळे
वय : ३५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी,
रा. ब्रिजवाडी, डाळमीलच्या जवळ,
ता.जि.औरंगाबाद ४३११३६. ...सामनेवाली.

**अर्ज – हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(१)(i–अ) अन्वये विवाह विच्छेदनाकरीता.**

..........................................................................................
ॲड. श्रीमती वैभवी भट – अर्जदारातर्फे
एकफर्ता – सामनेवाली विरुध्द.
..........................................................................................

**न्या य नि र्ण य**
(आज दिनांक ०५ मार्च २०२५ रोजी पारीत)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(१)(i–अ) नुसार विवाह विच्छेदनासाठी दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदाराचे कथन आहे की, त्याचा विवाह सामनेवाली सोबत दिनांक ११/०५/२००८ रोजी रितीरिवाजानुसार नातेवाईकांच्या व आईवडीलांच्या संमत्तीने झाला आहे. सदर लग्न संबंधातुन त्यांना प्रतिक वय १३

वर्षे नावाचा मुलगा आहे. तो मजुरी करुन त्याच्या घराचा प्रपंच व्यवस्थितरित्या पार पाडीत होते. अर्जदारासोबत त्याचे वयोवृध्द आईवडील राहत आहेत. वडील वामन हे ७० वर्षांचे असून त्यांना मागील ब–याच महिन्यापासून दमा हा आजार असून त्यांना चालता फिरता येत नाही याची सामनेवालीला माहिती आहे.

३. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, नोव्हेंबर २०२१ मध्ये अर्जदार घरात जेवत असताना त्याच्या वडिलांनी पाणी मागितले असता सामनेवालीने जाणुनबुजून पाणी देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे अर्जदाराने तिला विचारले असता तीने अर्जदारास उलटसुलट बोलून त्याचा अपमान करुन भांडण उकरुन काढले. सामनेवालीने तिच्या वडिल व भावाला फोन करुन बोलावून घेतले असता तिचे भाऊ सुरेश व कमलेश व वडील कडुबा असे दिनांक २४/११/२०२१ रोजी अर्जदाराच्या घरी आले व अर्जदाराला काहीएक न विचारता त्याचा गळा पकडून शिवीगाळी करण्यास सुरुवात केली. ते सामनेवालीची चुक मान्य करण्यास तयार नव्हते. सामनेवालीच्या वडिलांनी अर्जदाराचा कोणताही मानसन्मान ठेवला नाही. अर्जदाराला शिवीगाळी केली. सामनेवालीने अर्जदारास 'तु मेला तरी चालेल पण मी घरी येणार नाही' असे बोलली. अर्जदाराने तिला बराच समजावण्याचा प्रयत्न केला परंतु ती माहेरी निघून गेली व आजतागायत नांदण्यासाठी अर्जदाराकडे परत आली नाही.

४. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार सामनेवालीला परत घरी आणण्याकरीता सामनेवालीच्या माहेरी ३ वेळा गेले होते परंतु तीने त्याच्या सोबत यायला ठाम नकार देवून तिचे वडील व भावांचे ऐकून नांदायला यायचे नाही असे अर्जदाराला स्पष्टपणे सांगत आहे.

५. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाली तिचा लहान मुलगा प्रतिक याचा देखील विचार करीत नसून त्याला अर्जदाराकडे सोडून माहेरी राहत आहे. सामनेवाली आई, पत्नी व सून म्हणून घरी यावे असे अर्जदाराला वाटत आहे. परंतु सामनेवाली ही नांदण्याकामी येण्यास जाणुनबूजून टाळाटाळ करीत आहे. सामनेवालीला अर्जदारासोबत नांदण्यास रस नसल्यामुळे बहाणे करत आहे.

६. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, त्याचे सासरे कडुबा व मेव्हणे सुरेश व कमलेश हे नेहमी फोन करुन त्याला गलिच्छ भाषेत शिवीगाळी करुन जिवे ठार मारण्याची धमकी देवून दमदाटी देवून ' तु गावाला आलास तर तुझा खुन करु' अशी दमदाटी करतात.

७. अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, सामनेवालीने त्याला पती म्हणून कुठलाही दर्जा दिला नसून पदोपदी अपमान करुन मानसीक त्रास दिला आहे. अर्जदाराने बरेच प्रयत्न केले परंतु सामनेवाली ही सुधारत नसुन तिला अर्जदाराचे वडिल नको आहेत. मुलगा प्रतिकला सोडून गेल्यापासून कधीही भेटायला किंवा बोलायला आलेली नाही. त्यामुळे मुलगा आईच्या प्रेमापासून दुर राहीला. अर्जदाराने सामनेवाली नांदण्याकामी परत यावी म्हणून वकिलामार्फत नोटीस पाठवली परंतु ती नांदण्यासाठी अर्जदाराकडे आली नाही. त्यामुळे प्रस्तुत

अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

८. या याचिकेची नोटीस सानमेवालीला काढण्यात आली. परंतु ती हजर न झाल्यामुळे तिच्या विरुध्द निशाणी क्र.१ वर दिनांक २६/०७/२०२४ रोजी याचिका एकतर्फा चालवण्याचा आदेश पारीत करण्यात आला. त्यामुळे वाद मुद्दे काढण्यात आले नाहीत व प्रकरण पुराव्याला लावण्यात आले.

९. अर्जदाराने आपल्या कथनांचे पूष्ठर्थ तोंडी पूरावा म्हणून आपले पुरावा शपथपत्र निशाणी क्र.१५ दाखल केले. तर कागदोपत्री पूरावा म्हणून अर्जदाराने अर्जदार व सामनेवालीच्या लग्नाची पत्रिका–नि.क्र.१९, अर्जदाराच्या आधारकार्डची साक्षांकित प्रत–नि.क्र.२० दाखल केली आहे. पुरावा बंद पूरसीस निशाणी क्र.२१ दिली.

**१०**. तर सामेवालीतर्फे कोणताही तोंडी पूरावा देण्यात आला नाही व कोणताही कागदोपत्री पूरावा आलेला नाही.

**११**. अर्जदाराने आपले पूराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.१५ मध्ये आपल्या अर्जातील कथनाप्रमाणे कथन केले. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदोपत्री पुरावा लग्नाची पत्रिका–नि.क्र.१९ चे अवलोकन केले असता असे दिसते की अर्जदार व सामनेवाली यांचा विवाह दिनांक ११/०५/२००८ रोजी झाला असे स्पष्ट होते. या बाबत त्याने आपल्या अर्जात व पुराव्याच्या शपथपत्रात ही नमुद केले. तसेच त्यांना एक प्रतिक नावाचा मुलगा आहे असे ही त्याने कथन केले. सामनेवाली प्रकरणात हजर झाली नाही. त्यामुळे अर्जदाराने सामनेवाली सोबतचे नाते सिध्द केले असे म्हणता येते.

**१२.** मान्यता या अर्जदाराच्या पुराव्यातील घटना नाकारण्यास्तव सामनेवालीतर्फे उलटपासणी घेण्यात आली नाही. तसेच सामनेवालीने बचाव म्हणून आपले म्हणणेही दाखल केले नाही. अशा परिस्थितीत अर्जदार नमूद केलेल्या घटनांबाबत सामनेवालीच्या विरोधात विरुध्द अनुमान काढावा लागतो. मान्यता हा अर्ज अर्जदाराने क्रुरता या मुद्यावर दाखल केला. क्रुरते बाबत त्याने अर्जामध्ये व पुराव्यामध्ये स्पष्टपणे सांगितले. या सर्व बाबी अशा दर्शवतात की, अर्जदाराला सामनेवाल्याने क्रुरतेची वागणूक दिली. कारण असे घडले नव्हते असा निष्कर्ष काढण्यासाठी सामनेवालीतर्फे पटलावर कोणताही पुरावा किंवा कथन नाही. म्हणजेच या घटना घडल्या होत्या हे तिला मान्य आहे असा निष्कर्ष काढता येईल.

**१३.** अशा प्रकारे सामनेवालीने आपल्या सोबत क्रुरता केली ही बाब घटस्फोट घेण्यासाठी कारणे ठरु शकते असे अर्जदाराने सिध्द केलेले आहे असे म्हणता येते. म्हणजेच हा अर्ज मंजूर करावा लागेल. म्हणून पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार व सामनेवाला यांचेतील दिनांक ११/०५/२००८ रोजी संपन्न झालेला विवाह हुकूमनाम्याच्या तारखेपासून हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(१)(i–अ) अन्वये विच्छेदीत होवून त्यांचेत घटस्फोट झाला असे जाहिर करण्यात येते.

३. प्रस्तूत हुकूमनाम्याची सत्यप्रत अर्जदार व सामनेवाल्यास हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम २३(४) अन्वये मोफत द्यावी.

४. येणे प्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

५. (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SATISH YADAVRAO KADAM
Digitally signed by SATISH YADAVRAO KADAM
Date: 2025.03.06 16:07:53 +0530

**(सतिश या. कदम)**

दिनांक : ०५/०३/२०२५. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ठिकाण : पालघर पालघर.